# **मंत्री सुभाष फळदेसाई:** दिव्यांगांशी संबंधित विषयांवर जागृती

**‘पर्पल फेस्ट’ मध्ये यंदा लघुपट महोत्सव; शिक्षणविषयक परिषदही**

**लघुपट प्रवेशिका 29 डिसेंबरपर्यंत**
दिव्यांगांचे विषय मांडणाऱ्या ५ मिनिटे अवधीचे लघुपट प्रवेशिका मागवल्या आहेत. या प्रवेशिका २९ डिसेंबरपर्यंत स्वीकारल्या जातील. तसेच त्यात इंग्रजी सबटायटल्स आणि श्राव्य वर्णने आवश्यक आहेत. सर्वोत्कृष्ट प्रथम तीन प्रवेशिकांना अनुक्रमे ३० हजार रुपये, २० हजार रुपये आणि १० रुपयांची हजारची बक्षिसे दिली जाणार आहेत.

**पर्वरी, ता. २३ (प्रतिनिधी):** येथे जानेवारी २०२४ मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पर्पल फेस्टमध्ये ‘पर्पल इंटरनॅशनल व्ही केअर लघुपट महोत्सव’ आणि सर्वसमावेशक शिक्षणावर ‘पर्पल इंटरनॅशनल परिषदेचे’ आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती समाज कल्याणमंत्री सुभाष फळदेसाई यांनी आज पर्वरी येथे मंत्रालयात पत्रकार परिषदेत दिली. दिव्यांगांशी संबंधित विषयांची जागृती वाढवणे हा या मागचा प्रमुख हेतू आहे असे त्यांनी सांगितले.

‘द पर्पल इंटरनॅशनल व्ही केअर लघुपट महोत्सव’ गोवा दिव्यांगजन आयोग, राज्य समाज कल्याण संचालनालय, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या केंद्रीय दिव्यांगजन सबलीकरण खाते संयुक्त राष्ट्र, अपीजय इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन, दिल्ली आणि ब्रदरहूड संस्था यांच्या सहकार्याने आयोजित करणार आहे. ८ ते १३ जानेवारी या कालावधीत हा महोत्सव होईल, असे फळदेसाई यांनी सांगितले. याचबरोबर सर्वसमावेशक शिक्षणावर ‘पर्पल इंटरनॅशनल परिषद’चे आयोजन ९ ते ११ जानेवारी या कालावधीत होणार आहे. ही परिषद गोवा दिव्यांगजन आयोग, राज्य समाज कल्याण संचालनालय, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या केंद्रीय दिव्यांगजन सबलीकरण खाते, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस आणि ब्रदरहूड, मुंबई यांच्या सहकार्याने आयोजित करणार आहे.

गोवा राज्य दिव्यांगजन आयुक्त गुरुप्रसाद पावसकर यांनी तरुणांपर्यंत पोचण्यासाठी चित्रपट माध्यमाचे महत्त्व अधोरेखित करून हा लघुपट महोत्सव दिव्यांगांविषयीच्या जाणिवा अधिक चांगल्या प्रकारे पोहचवू शकेल, असा विश्वास व्यक्त केला. कोवळ्या वयातच सर्वसमावेशकतेचे तत्त्व तो बिंबवू शकेल, अशी आशाही व्यक्त केली.